## राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, कोंकण खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १८ (१) अन्वये झालेली तक्रार

**तक्रार क्रमांक : १८८२/२०२१**

**तक्रारकर्ता,** श्री.संदेश सुरेश सारंग,
घर नं. ४१४२/ए-३ हरिओम,
भागेश्वर मंदिर जवळ, किल्ला, ता.जि.ठाणे

विरुध्द

विद्यमान जन माहिती अधिकारी तथा पोलीस उपअधीक्षक (गृह), रत्नागिरी, पोलीस अधिक्षक रत्नागिरी यांचे कार्यालय, डॉ.बाबासाहेब आंबेडकर मार्ग, जेल रोड, ता.जि.रत्नागिरी ४१५ ६१२.

तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा पोलीस उपअधीक्षक (गृह), रत्नागिरी, पोलीस अधिक्षक रत्नागिरी यांचे कार्यालय, डॉ.बाबासाहेब आंबेडकर मार्ग, जेल रोड, ता.जि.रत्नागिरी ४१५ ६१२

**तक्रार सुनावणीचा दिनांक : ११/८/२०२५**

| माहितीचा अर्ज दाखल केल्याचा दिनांक | जन माहिती अधिकारी यांच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपिल अर्ज प्राप्त दिनांक | प्रथम अपिल आदेश प्राप्त दिनांक |
|---|---|---|---|
| ७/७/२०२१ | २८/७/२०२१ | १३/७/२०२१ | १७/९/२०२१ |

तक्रारकर्ता यांनी दि.४/१२/२०२१ रोजीच्या अर्जान्वये " माहिती दिली नाही " असे कारण नमूद करुन कलम १८(१) अन्वये तक्रार अर्ज दाखल केला आहे. सदर तक्रार अर्जावर आज दिनांक ११/८/२०२५ रोजी सुनावणी घेण्यात आली.

सदर सुनावणीस तक्रारकर्ता उपस्थित आहेत. तसेच विद्यमान जन माहिती अधिकारी श्रीमती राधिका फडके, पोलीस उपअधीक्षक(मुख्या), पोलीस अधीक्षक कार्यालय रत्नागिरी ऑनलाइन उपस्थित आहेत व तत्कालिन जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत. (कार्यालयाद्वारे नोटीस पाठविलेबाबतचे ट्रॅकिंग रिपोर्ट सादर करण्यात आले असून, ते नस्तीसोबत अभिलेखावर ठेवण्यात आलेले आहेत)

तक्रारकर्ता यांनी मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्राणे माहिती मागितली आहे.

" *पोलीस अधिक्षक कार्यालयात, माहिती किंवा कागदपत्रे मिळण्यासाठी केलेल्या अर्जाचे अनुषंगाने उत्तर देणेसाठी शासनाचे अगर पोलीस खात्याने निश्चित केलेला कालावधी नमूद असलेले परिपत्रक/आदेश मिळणेबाबत व इतर माहिती*"

तद्नंतर तक्रारकर्ता यांनी प्रथम अपिलीय प्राधिकारी यांचेकडे कलम १९ (१) अन्वये प्रथम अपील दाखल केले.

तक्रारकर्ता यांनी दाखल केलेल्या प्रथम अपीलावर तत्कालीन प्रथम अपीलीय प्राधिकारी यांनी सुनावणी घेऊन दि.१७/९/२०२१ रोजी, "*अपिलार्थी यांनी मागणी केलेली वरीलप्रमाणे अभिलेखावर उपलब्ध असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी १५ दिवसामध्ये विनाशुल्क पुरवावी.*" असा निर्णय दिलेला आहे.

तक्रारकर्ता यांनी निवेदन केले की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी दि.२८/७/२०२१ च्या पत्रान्वये असे कळविले की, त्यांनी मागणी केलेल्या माहितीपैकी मुद्दा क्र.१ ते ३ ची माहिती महाराष्ट्र शासनाचे https://www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर तसेच पोलीस महासंचालक महाराष्ट्र राज्य मुंबई यांचे https://www.mahapolice.gov.in या वेबसाईट वर उपलब्ध असल्याने आपण ती सदर संकेतस्थळावरून प्राप्त करून घ्यावी.

जन माहिती अधिकारी यांचे आदेशाने समाधान न झाल्याने तक्रारकर्ता यांनी प्रथम अपीलीय अधिकारी यांचेकडे अपील सादर केले. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी अपील मान्य केले व अभिलेखावर उपलबध असलेली माहिती १५ दिवसात माहिती पुरवावी असे आदेश दिले. त्यानंतर दि.६/१०/२०२१ रोजीच्या पत्रान्वये ३३ पृष्ठांची माहिती दिली आहे.

तक्रारकर्ता यांचे म्हणणे आहे की, त्यांना त्यांनी मागितलेल्या माहितीपैकी मुद्दा क्र.२ व्दारे मागणी केलेप्रमाणे सन २००७ ते २००९ या कालावधीची सेवाज्येष्ठता यादी दिली नाही. यासंदर्भात खुलासा करताना जन माहिती अधिकारी यांचे तर्फे सांगण्यात आले की, सदर माहितीचा शोध घेतला ती आढळून येत नाही. ती आढळून न येण्याचे कारण म्हणजे उपरोक्त कालवधी मध्ये सेवा ज्येष्ठता यादी तयारच केली नाही काय, अशी विचारणा जन माहिती अधिकारी यांना केली असता सदरची माहिती तयार केली होती तथापि ती आता आढळून येत नाही असे जन माहिती अधिकारी यांचे तर्फे सांगण्यात आले.

शासकीय कर्मचारी यांची सेवाज्येष्ठता यादी सर्वसाधारणपणे दरवर्षी तयार केली जाते. ही यादी दोन स्वरूपात तयार केली जाते ज्यामध्ये प्रथमत: प्रारूप सेवा ज्येष्ठता यादी तयार केली जाते व ती सर्व कर्मचाऱ्यांच्या माहितीसाठी प्रसिध्द करून त्याची एक प्रत संबंधितांना देण्यात येते. या यादीवर कोणाला आक्षेप घ्यावयाचा असल्यास त्यासाठी कालावधी देण्यात येतो. या कालावधीत प्राप्त झालेल्या आक्षेपांचा विचार करून त्यावर निर्णय घेऊन अंमित सेवाज्येष्ठता यादी तयार केली जाते. ही अंतिम सेवा ज्येष्ठता यादी शासकीय कर्मचाऱ्यांच्या पदोन्नती व इतर बाबींसाठी वापरली जाते. या यादीची प्रत सर्वसाधारपणे ज्यांचा यादीत समावेश असेल त्या सर्वांना देण्यात येते तसेच ती कार्यालयाच्या नस्तीमध्ये सुध्दा कायमस्वरूपी अभिलेख म्हणून जतन करून ठेवण्यात येते. असे असताना सन २००७ ते २००९ या तीन वर्षाच्या कालावधीची पोलीस अंमलदार या पदावरील कर्मचाऱ्यांची सेवा ज्येष्ठता यादीच जर पोलीस अधीक्षक कार्यालय रत्नागिरी येथे उपलब्ध नसेल तर ती बाब गंभीर स्वरूपाची आहे. पोलीस अधीक्षक कार्यालय रत्नागिरी कार्यालयाने या प्रकरणी चौकशी करणे अपेक्षित होते. तथापि त्यांची चौकशी झाल्याचे दिसून येत नाही.

यास्तव आयोग पुढील आदेश देत आहे.

**आदेश**

१. विद्यमान जन माहिती अधिकारी तथा पोलीस उप अधीक्षक, पोलीस अधीक्षक कार्यालय रत्नागिरी यांनी तक्रारकर्ता यांनी माहिती अर्जान्वये मागणी केलेल्या माहितीपैकी मुद्दा क्र.२ व्दारे मागणी केलेली माहिती त्यांना ३० दिवसात माहितीचा शोध घेऊन उपलब्ध करून द्यावी. सदर ३० दिवस कालावधी मध्ये माहितीचा शोध होऊ शकला नाही तर पोलीस अधीक्षक रत्नागिरी या सार्वजनिक प्राधिकरणाने महाराष्ट्र सार्वजनिक अभिलेख २००५ मधील तरतूदीनुसार फौजदारी स्वरूपाची कारवाई करावी व त्याचा अहवाल आयोगास पुढील सुनावणीस सादर करावा.

२. प्रस्तुत प्रकरणाची पुढील सुनावणी दि.१५/१०/२०२५ रोजी दुपारी २.०० वाजता होईल.

(शेखर चन्द्रे)
**राज्य माहिती आयुक्त,**
**कोंकण खंडपीठ**

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : ११ ऑगस्ट, २०२५ .

**प्रत आवश्यक कार्यवाहीस्तव रवाना**
पोलीस अधीक्षक, रत्नागिरी
पोलीस अधीक्षक कार्यालय रत्नागिरी,
डॉ.बाबासाहेब आंबेडकर मार्ग, जेलरोड, रत्नागिरी ४१५६१२.

Comp-३